# राज्यात संयुक्त कुष्ठरोग आणि सक्रिय क्षयरुग्ण शोध अभियानाला सुरुवात

नागरिकांनी सहकार्य करण्याचे सार्वजनिक आरोग्य विभागाचे आवाहन

**पुणे :** राज्याच्या सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत सोमवार २० नोव्हेंबरपासून संयुक्त कुष्ठरोग शोध अभियान आणि सक्रिय क्षयरुग्ण शोध मोहिमेला सुरुवात करण्यात आली. हे अभियान ६ डिसेंबरपर्यंत राबविण्यात येणार असून अधिकाधिक नागरिकांनी या अभियानाचा लाभ घ्यावा आणि आपल्या घरातील, तसेच परिसरातील संशयित कुष्ठरुग्ण आणि क्षयरुग्णांची माहिती आरोग्य विभागाच्या कर्मचाऱ्यांना देऊन या विशेष अभियानाला सहकार्य करावे, असे आवाहन सार्वजनिक आरोग्य विभागाच्यावतीने करण्यात आले आहे.

अभियानांतर्गत शहरी व ग्रामीण भागात शोधलेला एकही रुग्ण उपचारापासून वंचित राहणार नाही याची दक्षता आरोग्य विभागामार्फत घेण्यात येणार आहे. केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सूचनेनुसार या संयुक्त अभियानाची आखणी आणि नियोजन करण्यात आले आहे. त्या अंतर्गत घरोघर सर्वेक्षणाद्वारे समाजातील निदान न झालेले कुष्ठरुग्ण आणि सक्रिय क्षयरुग्ण शोधून त्यांना त्वरित औषधोपचाराखाली आणण्यात येणार आहे. संयुक्त कुष्ठरोग व सक्रिय क्षयरोग शोध मोहिमेसाठी आरोग्य विभागाने राज्यभरात ६५ हजार ८३३ पथके तयार केली आहेत. एक पथक एका दिवसात शहरी भागातील २५ आणि ग्रामीण भागातील २० घरांना भेटी देणार आहे. गृहभेटी अंतर्गत राज्यातील १ कोटी ७५ लाख घरांचे सर्वेक्षण केले जाणार असून, अंदाजे ८ कोटी ६६ लाख लोकसंख्येचे सर्वेक्षण केले जाणार आहे.

गेल्या ५ वर्षापासून राज्यात दरवर्षी कुष्ठरोग शोध अभियान राबविण्यात येते. या अभियानात १०० टक्के ग्रामीण लोकसंख्येची व साधारणतः २० टक्के शहरी लोकसंख्येची एक आशा सेविका व एक पुरुष स्वयंसेवकाच्या पथकाद्वारे प्रत्यक्ष शारीरिक तपासणी करुन संशयित लक्षणे असलेले रुग्ण शोधून काढले जाणार आहेत. या संशयितांची वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून तपासणी करुन कुष्ठरोगाचे निदान झालेल्या कुष्ठरुग्णांवर बहुविध औषधोपचार करण्यात येणार आहेत. राष्ट्रीय क्षयरोग दूरिकरण कार्यक्रमांतर्गत २०१७-१८ पासून राज्यात दरवर्षी जोखमीच्या भागामध्ये सक्रिय क्षयरुग्ण शोध मोहीम राबविण्यात येते. या मोहेमेंतर्गत घरोघरी सर्वेक्षण करून क्षयरोगाचे निदान झालेल्या रुग्णांवर मोफत औषधोपचार करण्यात येणार आहेत. नागरिकांनी आरोग्य विभागाच्या या विशेष अभियानाला सहकार्य करावे आणि कुष्ठरोग व क्षयरोगाच्या समूळ निर्मूलनासाठी आपले योगदान द्यावे, असे आवाहनही सार्वजनिक आरोग्य विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

*राज्याच्या सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत सोमवार २० नोव्हेंबरपासून संयुक्त कुष्ठरोग शोध अभियान आणि सक्रिय क्षयरुग्ण शोध मोहिमेला सुरुवात करण्यात आली. हे अभियान ६ डिसेंबरपर्यंत राबविण्यात येणार असून अधिकाधिक नागरिकांनी या अभियानाचा लाभ घ्यावा आणि आपल्या घरातील, तसेच परिसरातील संशयित कुष्ठरुग्ण आणि क्षयरुग्णांची माहिती आरोग्य विभागाच्या कर्मचाऱ्यांना देऊन या विशेष अभियानाला सहकार्य करावे, असे आवाहन सार्वजनिक आरोग्य विभागाच्यावतीने करण्यात आले आहे.*

## मंचर-पारगाव कारखाना एसटीचा ब्रेक फेल




**निरगुडसर :** मंचर एसटी आगाराची मंचर पिंपळगाव मार्गे पारगाव कारखाना एसटी बसचा हवेचा पाईप फुटल्याने अचानक ब्रेक फेल झाले होते. त्यामुळे प्रवाशी व नागरिकांची एकच धांदल उडाली मात्र चालकाने प्रसंगावधान दाखवत गाडी गियरवर कंट्रोल केल्याने जवळपास बसमधील ७० प्रवाशांचे प्राण वाचले आहेत. हि घटना दिनांक २० रोजी दुपारी ३:३० चे दरम्यान मंचर पिंपळगांव रस्त्यावर घडली. मंचर आगातून मंचर पिंपळगाव तर्फे पारगाव कारखाना बस सोमवारी दुपारच्या सुमारास प्रवाशांना घेऊन निघाली होती. संतोष नारायण लांडे हे चालक होते तर वाहक म्हणून चंद्रकांत चपटे कार्यावर होते. गाडीत ७० प्रवासी घेऊन जात असताना गाडीचा ब्रेक थोडा कमी होता त्यामुळे गाडीची स्पीड कमीच होते. पिंपळगांवच्या आसपास गाडी चालवत असताना गाडीचा हवेचा पाईप अचानक तुटला त्यामुळे ब्रेक फेल झाला. त्यावेळी चालकांनी गाडी गियर मध्ये कंट्रोल करून बसमधील प्रवाशांचे प्राण वाचवले.

## थोडक्यात

### भरधाव वाहनाच्या धडकेत तरुण ठार

**निरगुडसर :** भरधाव वाहनाने दिलेल्या धडकेत दुचाकीवरील एक जण जागीच ठार झाला, तर दुसरा जखमी झाला आहे. मंचर (ता. आंबेगाव) येथे पुणे-नाशिक महामार्गावर हॉटेल मनोरंजनसमोर रविवारी (दि. १९) सायंकाळी सव्वासहा वाजता हा अपघात घडला आहे. राजेश ज्ञानेश्वर थोरात (वय ३३) असे अपघातात ठार झालेल्या तरुणाचे नाव आहे. तर तोहसीफ नदीम पठाण हा किरकोळ जखमी झाला. याप्रकरणी ईकबाल पठाण ( रा. मंचर, ता. आंबेगाव) यांनी मंचर पोलिस ठाण्यात धडक देणाऱ्या वाहनचालका विरोधात यांनी फिर्याद दिली आहे.

मंचर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, राजेश थोरात व तोहसीफ पठाण हे दोघे रविवारी सायंकाळी सव्वासहा वाजता दुचाकीवरून पुणे- नाशिक महामागनि पेठ बाजूकडून मंचरच्या दिशेने जात होते. हॉटेल मनोरंजनसमोर त्यांना भरधाव वाहनाने धडक दिली, त्यात दोघे जखमी झाले. त्यांना उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. मात्र, राजेशचा उपचारापूर्वीच मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केल्याचे फिर्यादीत नमूद केले आहे. सहायक पोलिस निरीक्षक संतोष साळुंखे हे पुढील तपास करीत आहेत.

### जातेगाव खुर्दमध्ये नदी लगत आढळला मृत मोर

**शिक्रापूर :** जातेगाव खुर्द ता. शिरुर येथील काही युवक नदीच्या कडेला गेले असताना त्यांना एक मोर मृत अवस्थेत पडला असल्याचे दिसून आले, याबाबतची माहिती वनविभाग वनपरिमंडल अधिकारी गौरी हिंगणे यांना मिळताच वनविभाग रेस्क्यू टीमचे वैभव निकाळजे, शेरखान शेख, पोलीस पाटील कृष्णा गजरे, राहुल गायकवाड, चंद्रकांत निकाळजे, निखील काळे यांनी सदर ठिकाणी धाव घेत मृत मोराला ताब्यात घेतले, तर नियतक्षेत्र अधिकारी बबन दह्तोंडे यांनी सदर मोराचा पंचनामा करुन त्याचे वनविभागाच्या हद्दीमध्ये दहन करण्यात आले आहे.

## पिंपरी-चिंचवडमधील खेळाडूंना मिळणार ३ हजारांपासून साडे पाच हजार रुपयांची क्रीडा शिष्यवृत्ती

**पिंपरी / प्रतिनिधी**

राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धा, आंतरविद्यापीठ तसेच राष्ट्रीय स्तरावरील क्रीडा स्पर्धांमध्ये सहभागी होणाऱ्या खेळाडूंना आता क्रीडा शिष्यवृत्ती दिली जाणार आहे. राज्य शासनाच्या क्रीडा विभागाच्या सूचनेनुसार पिंपरी-चिंचवड महापालिका त्याची अंमलबजावणी करणार आहे. त्यासाठी महापालिकेच्या क्रीडा विभागाकडे अर्ज सादर करण्याचे आवाहन महापालिकेने केले आहे. त्यानुसार शहरातील गुणवंत खेळाडूंना साडे तीन हजार ते साडे पाच हजार रुपयांपर्यंत वार्षिक क्रीडा शिष्यवृत्तीचा हातभार लावला जाणार आहे.

२०२२-२३ या वर्षाची क्रीडा शिष्यवृत्ती २०२३-२४ मध्ये पात्र विद्यार्थी खेळाडूंना देण्यात येणार आहे. त्यासाठी खेळाडूंनी २८ नोव्हेंबर ते २९ डिसेंबर या काळात विहित नमुन्यात अर्ज करावा लागणार आहे. हा अर्ज क्रीडा विभाग अथवा महापालिकेच्या www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर डाऊनलोड करून घेऊन आवश्यक त्या कागदपत्रांसह सादर करायचा आहे. १० डिसेंबर ते २९ डिसेंबर २०२३ या कालावधीत महापालिकेच्या वेळेत क्रीडा विभागात सादर करायचा आहे. मुदत संपल्यानंतर प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नसल्याची माहिती महापालिकेने दिली आहे.

शिष्यवृत्तीचा मिळणारा लाभ

पिंपरी चिंचवड महापालिका परिसरातील गुणवान विद्यार्थी खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी महापालिकेने क्रीडा शिष्यवृत्तीची योजना सुरू केली आहे. ही शिष्यवृत्ती महाराष्ट्र शासन क्रीडा व युवक संचालनालय यांच्या तर्फे दिली जाणार आहे. राज्यस्तरीय शालेय क्रीडा स्पर्धा, आंतरविद्यापीठ स्तर, राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धा आदी स्पर्धा खेळणाऱ्यांचा यामध्ये समावेश केला आहे. राज्यस्तरीय शालेय क्रीडा स्पर्धेत सहभागी झालेल्या विद्यार्थी खेळाडूंना वर्षाकाठी ३ हजार ३०० रुपये दिले जाणार आहेत. यासह असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटी तर्फे आयोजित आंतरविद्यापीठ (राष्ट्रीय) स्तरावर सहभागी झालेल्या विद्यार्थी खेळाडूंना वार्षिक ३ हजार ३०० रुपये मिळणार आहेत. तर राष्ट्रीय शालेय स्पर्धात (नॅशनल स्कूल गेम / स्कूल गेम फेडरेशन ऑफ इंडिया) तर्फे आयोजित राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धेत सहभागी झालेल्या विद्यार्थी खेळाडूंना ५ हजार ५०० रुपये क्रीडा शिष्यवृत्ती भेटणार आहे.

## दहावीच्या परीक्षा अर्जांसाठी ३० नोव्हेंबरपर्यंत मुदतवाढ

**पुणे / प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे मार्चमध्ये सुरू होणाऱ्या दहावी परीक्षेच्या अर्जांसाठी मुदतवाढ देण्यात आली आहे. आता नियमित शुल्कासह ३० नोव्हेंबरपर्यंत अर्ज करता येणार आहे. नियमित विद्यार्थी, पुनर्परीक्षार्थी, नावनोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले खासगी विद्यार्थी तसेच श्रेणीसुधार योजनेंतर्गत व तुरळक विषय घेऊन आणि आयटीआयचे विषय घेऊन प्रविष्ट होऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांचे ऑनलाइन पद्धतीने अर्ज करण्याची प्रक्रिया सुरू झाली.

त्याची मुदत सोमवारी संपली. त्यानंतर मंडळाकडून अर्जासाठी मुदतवाढ देण्यात आल्याची माहिती राज्य शिक्षण मंडळाचे सचिव अनुराधा ओक यांनी पत्रकाद्वारे दिली.येत्या दहावी परीक्षेसाठी ३० नोव्हेंबरपर्यंत नियमित शुल्कासह अर्ज करण्याची मुदत आहे. त्याप्रमाणे संबंधित माध्यमिक शाळांनी विद्यार्थ्यांचे अर्ज भरून चलन डाऊनलोड करून शुल्क २३ नोव्हेंबर ते ११ डिसेंबरपर्यंत भरायची आहे. तसेच विलंब शुल्कासह १ ते ८ डिसेंबर या कालावधीत अर्ज करता येईल. सविस्तर माहिती राज्य शिक्षण मंडळाच्या संकेतस्थळावर देण्यात आली आहे.

## पुणे जिल्ह्यात महारेशीम अभियानाचा शुभारंभ




**पुणे :** शेतकऱ्यांना रेशीम शेतीबाबत मार्गदर्शन करण्यासाठी आणि रेशीम शेतीचे फायदे शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी जिल्ह्यात २० नोव्हेंबर ते २० डिसेंबर २०२३ या कालावधीत महारेशीम अभियान राबविण्यात येत असून या अभियानाचा शुभारंभ पुणे विभागीय कृषी सहसंचालक रफीक नाईकवाडी आणि प्रादेशिक रेशीम कार्यालयाच्या सहसंचालक डॉ.कविता देशपांडे यांच्या हस्ते सोमवारी करण्यात आला.

राज्यात प्रथमच जिल्हा परिषद, रेशीम संचालनालय आणि राज्याचा कृषी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने महारेशीम अभियान राबविले जाणार असून या काळात जिल्ह्यामध्ये नव्याने रेशीम शेती करू इच्छिणाऱ्या शेतकऱ्यांची नोंदणी करण्यात येणार आहे.

राज्यात एकराच्या रेशीम शेतीतून अनेक शेतकऱ्यांनी चांगले उत्पन्न घेतले असून शेतकऱ्याचे जीवनमान उंचावण्याचे सामर्थ्य रेशीम शेतीमध्ये असल्याने पुणे जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी रेशीम शेतीकडे वळावे असे आवाहन श्री. नाईकवाडी यांनी यावेळी केले.

डॉ. देशपांडे म्हणाल्या, सुशिक्षित बेरोजगार शेतकरी युवकांनी नोकरीच्या मागे न धावता रेशीम शेतीकडे वळावे. बारामती येथे शेतकऱ्यांनी उत्पादीत केलेल्या कोषांची खरेदी केली जात असल्याने शेतकऱ्यांना कोष विक्रीकरिता कर्नाटकात जायची आवश्यकता यापुढे असणार नाही.

जिल्ह्यात महिनाभर चालणाऱ्या महरेशिम अभियान कालावधीत अधिकाधिक शेतकऱ्यांनी नाव नोंदणी करण्याकरिता जिल्हा रेशीम कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन रेशीम विकास अधिकारी संजय फुले यांनी केले.

कार्यक्रमाला आत्माचे प्रकल्प अधिकारी विजय हिरेमठ, अधीक्षक कृषी अधिकारी सिताराम कोलते, जिल्हा रेशीम कार्यालयातील वरिष्ठ तांत्रिक सहाय्यक संदीप आगवणे, वरिष्ठ क्षेत्र सहाय्यक आर.टी. पाटील, क्षेत्र सहाय्यक एस.एस. मैडकर, रिअरिंग ऑपरेटिव्ह एस.आर. तापकीर आणि अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

**TENDER SCHEDULE**

Hon.Balasaheb Thackeray Agri-business & Rural Transformation Project (SMART)

Govt. of Maharashtra is implementing World Bank assisted Hon. Balasaheb Thackeray Agribusiness And Rural Transformation (SMART) Project for developing Agriculture Commodity value chains. Arunodayagro Farmar Producer Co.Ltd is one of the beneficiaries under the project and inviting offline bids for the following goods.

| Name of Goods | Supply, Installation, Testing and Commissioning of Dal Mill Unit (2TPH) Fully Automatic | Supply, Installation, Testing and Commissioning of Tractor 57 HP | Supply, Installation, Testing and Commissioning of Saw Chipper Machine | Supply, Installation, Testing and Commissioning of AIR ASSISTEDS SPRAYER (AIROTEC 600) |
|---|---|---|---|---|
| Tender fee Amount is Rs. | Rs. 1000+18% GST | Rs.500+18% GST | Rs.500+18% GST | Rs.500+18% GST |
| EMD | In the form of bid security declaration | | | |
| Date of issue of Request for Quotation | 22/11/2023 | 22/11/2023 | 22/11/2023 | 22/11/2023 |
| Pre. Bid Meeting Date, Time & Address | 30/11/2023 @11.30 AM on following Address | 30/11/2023 @11.30 AM on following Address | 30/11/2023 @11.30 AM on following Address | 30/11/2023 @11.30 AM on following Address |
| Last Date & Time for submission of bid | 12/12/2023 @1.30 PM | 12/12/2023 @1.30 PM | 12/12/2023 @1.30 PM | 12/12/2023 @1.30 PM |
| Date & Time of opening of Technical bid | 12/12/2023 @2.00 PM | 12/12/2023 @2.00 PM | 12/12/2023 @2.00 PM | 12/12/2023 @2.00 PM |

Tender document is available at project website https://www.smart-mh.org in Procurement & tender section. For further any updates / notices shall be published on project website only.

**President**
**Arunodayagro Faarmar Producer Co.Ltd,**
Gat No 32/1 Takali (Kh) Tal.Karjat Dist.A.Nagar
Contact : 9423465151 Email: arunodayagro.Co.Ltd@gmail.com
Pre-bid Meeting, Tender Submission & Opening place
District Implementation Unit, SMART Project,
Project Director (ATMA), Near Pumping Station, Bhutkarwadi, Ahmednagar
Email- ahmednagar.diu.smart@gmail.com

**पुणे महानगरपालिका, पुणे**
**समाज विकास विभाग**
**निविदा जाहिरात**

विक्री कालावधी दिनांक : दि. २२/११/२०२३ ते दि. ०४/१२/२०२३ दुपारी ०२.३० पर्यंत — **जाहिरात क्र. : २/१२९५ दि.२१/११/२३**
स्विकृती कालावधी दिनांक: दि. २२/११/२०२३ ते दि. ०४/१२/२०२३ दुपारी ०३.०० पर्यंत — तांत्रिक निविदा उघडणे प्रक्रिया दिनांक दि.०५/१२/२०२३ दु.०३.००

| अ. क्र | निविदा क्रमांक | कामाचे नाव/ संपूर्ण तपशील | निविदा संच किमंत रु. | अंदाजित पूर्वगणित रक्कम रु | बयाणा रक्कम रु | कामाची मुदत | निविदा विषयक जबाबदार व्यक्तीचे नाव व दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | १८/२०२३ | सुगम्य भारत योजनेनुसार उपायुक्त क्र. ४ चे अंतर्गतच्या क्षेत्रिय कार्यालया अंतर्गत उद्यानांमध्ये दिव्यांग व्यक्तींकरिता स्वच्छतागृह बांधणे व इतर सोयी सुविधा निर्माण करणे. | १३५९ | ३३,६७,१९६/- | ३३,६७२/- | ३ महिने | विवेकानंद बडे ९५१८३४०९०४ |

**अ)** पुणे मनपाची वरील कामे ही अनुभवी म.न.पा. मान्यता प्राप्त/शासन मान्यता प्राप्त ठेकेदारांकडून (कामासाठीच्या पुर्वपात्रता अटी टेंडर सेट मध्ये नमूद केल्यानुसार) करून घ्यावयाची आहेत. **ब)** सदर कामांबाबत निविदा अटी / शर्ती इ. बाबतचा सर्व तपशिल निविदा संचामध्ये नमूद केला असून सदर कामांचे निविदा संच www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर पाहण्यासाठी उपलब्ध आहे. **क)** निविदा विक्रीच्या शेवटच्या दिवशी निविदा संच प्राप्त न झाल्यास व स्विकृतीच्या शेवटच्या दिवशी ऑनलाईन सादरीकरण न झाल्यास याची सर्वस्वी जबाबदारी निविदाधारकाची राहील. **ड)** बयाणा रक्कम ऑनलाईन सुविधेमार्फत स्विकारणेत येणार आहे. तसेच बाकी सर्व मजकुर www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर पाहण्यासाठी उपलब्ध आहे. **इ)** निविदा विक्री कालावधी दिनांक व वेळ, निविदा स्विकृती कालावधी दिनांक व वेळ तसेच तांत्रिक निविदा उघडणे प्रक्रियाचे दिनांक व वेळ www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर पाहण्यासाठी उपलब्ध आहे.

**सही/-**
**उप आयुक्त**
**समाज विकास विभाग**
**पुणे महानगरपालिका**

**एल&टी फायनान्स लिमिटेड**
**नोंदणीकृत कार्यालय:** 15वा मजला, पीएस श्रीजन टेक पार्क, प्लॉट नं. 52, ब्लॉक डीएन, सेक्टर V, सॉल्ट लेक सिटी कोलकाता 700 091, जिल्हा 24-परागणा उत्तर.
**CIN No.:** U65910WB1993FLC060810
**शाखा कार्यालय:** पुणे

L&T Finance

**गहाण मालमत्तेच्या विक्रीचा जाहीर लिलाव**

एल अँड टी फायनान्स लिमिटेडचा अधिकृत अधिकारी प्रतिभूतीकरण आणि वित्तीय मत्तांची पुनर्बांधणी आणि प्रतिभूती स्वारस्याची अंमलबजावणी कायदा, 2002 (54 वर्ष 2002) अन्वये आणि सदर कायद्यान्वये प्राप्त शक्तींचा वापर करत पुढील मालमत्तेचा **'जिथे आहे तिथे तत्त्वावर'** आणि **'जे आहे ते'** परिस्थितीत **'जाहीर ई-लिलावाच्या'** माध्यमातून देय रकमा आणि त्यांवरील व्याज, शुल्के आणि खर्च इ. वसुल करण्यासाठी ई-लिलाव करत आहे.

| कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | तारण ठेवलेल्या मालमत्तेचा पत्ता | कर्ज खाते क्रमांक (एक/अनेक) | भौतिक ताबा घेतला | बयाणा रक्कम आरपीच्या 10% किंवा जास्त (रुपयांमध्ये) | एकूण शिल्लक थकबाकी 17.11.2023 नुसार (रुपयांमध्ये) | आरक्षित किंमत (रुपयांमध्ये) | आरंभाची तारीख | लिलावाची तारीख आणि वेळ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. दिनेश रमणिकलाल पटेल भूत<br>२. जलपा दिनेश पटेल भूत | मालमत्तेचा पत्ता : रो हाऊस / बंगला क्र. आर1/15ए, अधिमापन 232 चौ.मी. सुमारे 2500 चौ.फूट, ''श्री स्वामी समर्थ को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेड'', अशा जमिनीवर बांधली आहे जिचा सर्व्हे क्र. 148, हिस्सा क्र. 1ए/1/2 सुस रोड पाषाण, पाषाण येथे स्थित, तालुका हवेली, जि. पुणे महाराष्ट्र 411045<br>सीमा: पूर्व R1/14B; पश्चिम R1/15B; उत्तर सोसायटी अंतर्गत रस्ता; दक्षिण R1/16A | H009840801210531 30/H009840801210 53130L/H00984080 12105313 0G | 11 ऑगस्ट 2023 | रु. 15,75,000/- | रु. 2,74,68,026.70 | रु. 1,57,50,000 /- | 02/12/2023 | सकाळी 11 वाजता 08/12/2023 |

**सार्वजनिक लिलावाच्या अटी आणि नियम**

1. अधिकृत अधिकाऱ्यांकडून सरफेसी कायद्या अंतर्गत https://sarfaesi.E-auctiontiger.net वेबसाइटवरून मदतीसह आणि जाहीर ई-लिलाव पध्दतीने, ऑनलाइन ई-लिलाव विक्री केली जात आहे.
2. जाहीर ई-लिलाव उपरोक्त दिनांक व वेळेरोजी पार पाडण्यात येईल, व सदर वेळी उपरोक्त प्रतिभूत मत्तांची **'जिथे आहे तिथे'** तत्त्वावर आणि **'जे आहे ते'** तत्त्वावर विक्री केली जाईल.
3. सदर जाहीर ई-लिलावत सहभागी होण्यासाठी, इच्छुक खरेदीदार/बोली लावणाऱ्यांना **07/12/2023** रोजी किंवा त्यापूर्वी पॅनकार्ड, कंपनीच्या बाबतीत मंडळाचे ठराव आणि पत्त्याचा पुरावायचंच्यासोबत ताब्यातील मालमत्तेच्या आरक्षित किंमतीच्या 10 टक्के परतावायोग्य अनामत रक्कम ठेव भरल्याचा तपशील सादर करावा लागेल.
4. या जाहीर ई-लिलावत यशस्वी न झालेल्या सर्व अन्य बोली लावणाऱ्यांचे ईएमडी LTF द्वारे सदर जाहीर ई-लिलावच्या समाप्तीनंतर 7 दिवसांच्या आत परत केले जाईल. या ईएमडी वर कोणतेही व्याज दिले जाणार नाही.
5. यशस्वी खरेदीदार/बोलीदाराने, त्याच्या/तिच्या प्रस्तावापैकी 25% रक्कम (बयाणा रकमेसह) मुंबई येथे देय होणाऱ्या डी.डी./पी.ओ.च्या स्वरूपात एल&टी फायनान्स लिमिटेड च्या नावे लिलावाच्या तारखेला म्हणजे **08/12/2023** रोजी 18:00 पर्यंत किंवा आधी अथवा कामकाजाच्या पुढील दिवशी म्हणजे **09/12/2023** भरावी, ह्या जमा रकमेची खात्री एल&टी फायनान्स लिमिटेडकडून दिली जाईल, जर तसं झालं नाही तर विक्री पूर्ण झाली नाही असे मानले जाईल आणि सदर बोलीदाराची बयाणा रक्कम जप्त केली जाईल. शिल्लक रक्कम म्हणजे खरेदी किंमतीच्या 75% रक्कम खरेदीदाराकडून एल&टी फायनान्स लिमिटेडला अचल मालमत्तेच्या विक्रीच्या खात्रीनंतर पंधराव्या दिवशी किंवा त्याआधी अथवा कायद्यातील तरतुदींनुतार अशा विस्तारित कालावधीत दिली जाईल.
6. मालमत्तेच्या परीक्षणासाठी किंवा अधिक माहितीसाठी, संभाव्य बोलीदार प्राधिकृत अधिकाऱ्याशी संपर्क साधू शकतात **ज्याचे नाव : शेखर काळे, एल अँड टी फायनान्स लि. - ऑफिस क्र. 301, 3रा मजला, झेनिथ कॉम्प्लेक्स, साकार संकुलाजवळ, शिवाजी नगर, पुणे - 411005 आणि संतोष तिवारी, संपर्क क्र. 9920490126 एल अँड टी फायनान्स लि, - कार्यालय : 6वा मजला, वृंदावन इमारत, प्लॉट क्र. 177, कलिना, सीएसटी रोड, मर्सीडीस शोरूम जवळ, सांताक्रूझ (पूर्व), मुंबई - 400 098.** लिलावाच्या कोणत्याही टप्प्यावर, प्राधिकृत अधिकारी कोणतेही कारण न देता किंवा कोणतीही पूर्व सूचना न देता बोली/प्रस्ताव स्वीकारू/नाकारू/बदलू/रद्द करू शकतो किंवा लिलाव पुढे ढकलू शकतो.
7. यशस्वी खरेदीदार/बोली लावणार हे लागू कायद्यानुसार सदर मालमत्ता त्याच्या/तिच्या/त्यांच्या नावे कन्वेड/डिलिवर्ड करुन घेण्यासाठी भरणे आवश्यक असलेले कोणतेही वैधानिक थकबाकी. कर, शुल्क, मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क इ. यांचे वहन करतील.
8. कर्जदार/हमीदार, जे सदर थकबाकीकरिता उत्तरदायी आहेत, ते सदर विक्री नोटीस ही अनामत व्याज (सक्तवसुली) अधिनियमांच्या नियम 8(6) खाली वर उल्लेखित जाहीर ई-लिलाव विक्रीच्या आयोजनाबाबत एक नोटीस म्हणून समजतील.
9. कर्जदार (एक/अनेक)/सह-कर्जदार (एक/अनेक)/गॅरेंटर (एक/अनेक)/मॉर्टगेजर (एक/अनेक) ह्यांना इथे कळवण्यात येत आहे की सदर जाहीर ई-लिलावाच्या तारखेआधी वर दिलेली संपूर्ण थकबाकी भरावी, अन्यथा सरफेसी कायदा, 2002 मधील तरतुदींनुसार एल&टी फायनान्स लि. सदर मालमत्ता विकेल.
10. कर्जदार (एक/अनेक)/सह-कर्जदार (एक/अनेक)/ गॅरेंटर (एक/अनेक)/ मॉर्टगेजर (एक/अनेक)/ सामान्य जनता ह्यांना प्रतिबंध करण्यात येत आहे की एल&टी फायनान्स लिमिटेडची पूर्व लेखी संमती मिळाल्याशिवाय सूचनेतील सिक्युअर्ड मालमत्ता विक्री, लीज किंवा इतर प्रकारे हस्तांतरीत करू नये.

**दिनांक:** 22.11.2023
**ठिकाण:** पुणे

स्वाक्षरी/-
**अधिकृत अधिकारी**
करिता एल&टी फायनान्स लिमिटेड

**मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अशोक विठ्ठल सोनवणे** यांनी शितल प्रिंटर्स, भूषणनगर, पोस्ट केडगाव (देवी) तालुका आणि जिल्हा अहमदनगर पिन-४१४००१ (महाराष्ट्र) येथे दैनिक लोकमंथन मुद्रित केले. व ४३१ सोमवार पेठ, सिद्धीविनायक केशर पुणे पिन नंबर ४११०११ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. ❋ व्यवस्थापकीय संपादक - रंजन साळवी. RNI : MAHMAR/2011/40983. Email - lokmanthan.pune@gmail.com